## प्रकरण १ ले

# गौरवग्रंथ : प्रेरणा, स्वरूप, परंपरा

# प्रकरण १ ले

# गौरवग्रंथ : प्रेरणा, स्वरूप, परंपरा

**१. प्रास्ताविक**

**२. गौरवग्रंथ : नवे अभ्यासक्षेत्र**

**३. गौरवग्रंथ : स्वरूप**

**४. गौरवग्रंथांच्या प्रेरणा**

**५. गौरवग्रंथांची परंपरा**

**५.१ वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन (गुरूवर्य दु. का. संत गौरवग्रंथ)**

५.१.१ व्यक्तिदर्शन

५.१.२ वाङ्मयाचे अध्यापन : तात्त्विक आणि व्यावहारिक विचार

५.१.३ वाङ्मयाचे अध्यापन : काही परिक्षेत्रे

५.१.४ वाङ्मयाचे प्रकारनिष्ठ अध्यापन

**५.२ साहित्य व समीक्षा ( कुसुमाग्रज गौरवग्रंथ)**

**५.३ नवसमीक्षा ( ह. श्री. शेणोलीकर गौरवग्रंथ )**

**५.४ साहित्यविचार ( रा. श्री. जोग गौरवग्रंथ )**

५.४.१ व्यक्तिदर्शन

५.४.२ वाङ्मयदर्शन

५.४.३ साहित्यचर्चा

५.४.४ स्वरूप विचार

५.४.५ निर्मिती विचार

५.५ साहित्य : अध्यापन आणि प्रकार ( वा. ल. कुलकर्णी गौरवग्रंथ )

५.६ साहित्य व समाज ( गो. मा. पवार गौरवग्रंथ )

५.७ समीक्षा-विविधा ( लीला गोविलकर गौरवग्रंथ )

# प्रकरण १ ले

# गौरवग्रंथ : प्रेरणा, स्वरूप, परंपरा

## १. प्रास्ताविक

मराठी वाङ्मयामध्ये दर्जेदार आणि अभ्यासपूर्ण ठरणाऱ्या साहित्याची दीर्घ परंपरा आहे. प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या कालखंडात असामान्य साहित्य संपदेची रचना झालेली आहे. काळ हाच वाङ्मयाचे मूल्यमापन करणारा अंतिम घटक मानला गेलेला आहे. आणि काळानेच अशा वाङ्मयाचे श्रेष्ठत्त्व सिद्‌ध केलेले आहे.

अलिकडील साठोत्तरी कालखंडामध्ये वेगवेगळे साहित्यप्रकार नव्याने रूढ झालेले आहेत. या परंपरेचाच एक भाग म्हणजे गौरवग्रंथ होत. गौरवग्रंथांची मराठी वाङ्मय व समीक्षेमध्ये स्वत:चे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केल्याचे दिसून येते. व्यक्तिगत जीवन आणि वाङ्मयीन कर्तृत्व या दोन्ही घटकांना मध्यवर्ती ठेऊन अशा स्वरूपाचे ग्रंथ सिद्‌ध झालेले आहेत. साहित्य, समाज, संस्कृती आणि संशोधन इ. वाङ्मयीन घटकांचे प्रतिबिंब यामध्ये आढळून येते. व्यक्तिगौरवाच्या निमित्ताने सिद्‌ध झालले हे गौरवग्रंथ साहित्य आणि सामाजिक वाटचाल या दृष्टीने परस्परपूरक आहेत. समीक्षेच्या दृष्टिकोणातून व्यापक स्वरूपाचे संदर्भमूल्य या ग्रंथांना प्राप्त झालेले आहे.

व्यापक आणि विशाल साहित्यसृष्टीमध्ये एक माणूस आणि सर्जनशील कलावंत म्हणून एखाद्या व्यक्तीच्या विशिष्टत्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न गौरवग्रंथातून होत असतो. मराठी समीक्षेमध्ये शिस्तबद्‌ध अभ्यासाची एक नवी परंपरा या माध्यमातून निर्माण झालेली आहे. याचाच शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणात केला जाणार आहे. गौरवार्ह व्यक्तीचा अभ्यासविषय केंद्रस्थानी ठेवून जाणीवपूर्वक विशिष्ट विषयावर लिहून घेतलेल्या लेखांच्या संग्रह स्वरूपात गौरवग्रंथ सिद्‌ध झालेले असतात. या गौरवग्रंथांचे नेमके स्वरूप काय आहे ? कोणत्या प्रेरणांमधून हे गौरवग्रंथ सिद्‌ध झालेले आहेत ? या गौरवग्रंथांचे वेगळेपण कोणते ? इ. प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न या पहिल्या प्रकरणात केलेला आहे. मराठी साहित्य व समीक्षेतील गौरवग्रंथांचे आगळे वेगळे विशेष व त्यांची परंपरा येथे उलघडून दाखविणे व गौरवग्रंथांचे स्वरूप, प्रेरणा आणि समीक्षादृष्ट्या वेगळेपण स्पष्ट करणे, हाही हेतू आहे.

## २. गौरवग्रंथ : नवे अभ्यासक्षेत्र :-

गौरवग्रंथ हा आशय व रचना ह्यांच्या दृष्टीने वेगळेपणाने उठून दिसणारा ग्रंथप्रकार विशेषत: स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रकर्षाने दिसून येतो. १९६० नंतर मराठी वाङ्मयात अनेक नवीन प्रवाह रूढ झालेले आहेत. काळानुसार समाज बदलतो आणि समाजातील बदलानुसार वाङ्मय बदलत असते. यादृष्टीने समाज आणि साहित्य यांचा अनुबंध दिसून येतो. काळानुसार समाज परिवर्तन झाल्यामुळेच

साहित्यातील आशय व कलारूपे बदलत गेलेली आहेत, यामुळेच साहित्य हे स्वभावत: वादग्रस्त संकल्पनांचे क्षेत्र बनलेले आहे. अशा बदलणाऱ्या संकल्पनांचा आशयाच्या संदर्भात वेध घेण्याचे कार्य साहित्य व समीक्षा क्षेत्रात आजही अखंड सुरू आहे.

एखाद्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आणि त्यांच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा मागोवा तसेच समीक्षादृष्ट्या अनेकविध विषयांना एकाच वेळी न्याय देण्याचे कार्य गौरवग्रंथातून होत आहे. गौरवग्रंथांची मांडणी लक्षात घेता; यातील 'व्यक्ती' जरी निमित्त असले तरी व्यक्ती ज्या क्षेत्राशी निगडीत आहे त्या क्षेत्राचे व्यापक संदर्भमूल्य या ग्रंथांना लाभलेले आहे. या गौरवग्रंथांमधून 'गौरवमूर्तींच्या' वाङ्मयीन भूमिकेचे परीक्षण तसेच समीक्षादृष्ट्या बहुविध विषयांना केंद्रबिंदू मानून विचार केलेला आहे.

गौरवग्रंथांच्या माध्यमातून गौरवास पात्र ठरलेले बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे पैलू तसेच त्यांच्या समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा मागोवा तसेच मराठी साहित्य व समीक्षेचे विद्यमान दर्शन घडताना दिसते.

**३. गौरवग्रंथ : स्वरूप :-**

'गौरवग्रंथ' हा एक ग्रंथप्रकार म्हणून स्वातंत्र्योत्तर कालखंडात वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयरूपात दिसून येतो. त्यांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्या इतपत (अत्यल्प ) असली तरी देखील त्यातील गौरवाची भावना लक्षात घेऊन विशेष क्षेत्राला गवसणी घालणाऱ्या अभ्यासकांच्या विस्तृत वाङ्मयीन कर्तृत्वाचा पट यामध्ये उलघडून दाखविलेला आहे, हेच दिसून येते. त्याचप्रमाणे समीक्षेतील अनेकविध विषयांचाही यात स्वतंत्रपणे विचार केलेला असतो. दोन्हींची परस्पर सांगड घालून बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यासकाला गौरवग्रंथांच्या माध्यमातून खरीखुरी गौरवांजली समर्पित केलेली असते, हेच दिसून येते.

अशा स्वरूपाच्या ग्रंथांचा विचार यापूर्वी स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून झालेला नाही. गौरवग्रंथांना जरी दीर्घ परंपरा नसली तरी देखील वाङ्मयीन पर्वाच्या विशिष्ट टप्प्यावर अशा गौरवग्रंथांचे समीक्षामूल्य अभ्यासाच्या दृष्टिकोणातून महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच अशा गौरवग्रंथांचे समीक्षामूल्य आणि त्यांचे वेगळेपण यांचा विचार करूनच येथे साधार विवेचन केलेले आहे.

गौरवग्रंथ ही संकल्पना केवळ वाङ्मयीन क्षेत्राच्या संदर्भातील नाही; तर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांत विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींवरही सिद्ध झालेले आहेत. किंबहुना काही राजकीय नेत्यांची व कार्यकर्त्यांची रौप्यमहोत्सवी, सुवर्णमहोत्सवी, हीरकमहोत्सवी, अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त गौरवग्रंथांची निर्मिती झालेली आहे. राजकीय तसेच सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तींच्या तुलनेत वाङ्मय-उपासकांचे गौरवग्रंथ अल्पप्रमाणात आहेत; असे अल्पप्रमाणात असले तरी देखील त्यातील गौरवाची भावना लक्षात घ्यावी लागते.

प्रामुख्याने गौरवग्रंथांचे स्वरूप संपादित स्वरूपात असते हेच दिसून येते. अनेकविध मान्यवर लेखकांच्या लेखमालेतून गौरवमूर्तींच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच त्यांच्या समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा पट उलघडून दाखविलेला असतो.

गौरवग्रंथांचे स्वरूप मूलत: आस्वादक तसेच विवेचक स्वरूपाचे आहे. व्यक्तिगत जीवन आणि वाङ्मयीन कर्तृत्व याबरोबरच बहुविध विषयांना समीक्षात्मक न्याय देण्याचा प्रयत्न गौरवग्रंथातून केलेला आहे, हे दिसून येते. या दृष्टिकोणातून गौरवग्रंथांच्या मूलभूत वैशिष्ट्यांचा शोध घेऊन स्वरूप निश्चित केलेले आहे. विविध गौरवग्रंथांचा विचार करता त्यांच्या रचनेमध्ये वैविध्य असले तरी आशयाच्या बाबतीत कमालीचे साम्य आढळून येते. गौरवग्रंथांचे प्रामुख्याने दोन किंवा त्यापेक्षा अधिक विभाग दिसतात. पहिल्या विभागात व्यक्तिदर्शन घडविलेले आहे तर दुसऱ्या विभागात समीक्षेतील बहुविध विषयांचे तात्त्विक व व्यावहारिक विवेचन आलेले आहे हे दिसून येते. एकंदरीत लक्षात घेता साहित्य, समाज आणि संशोधन इ. वाङ्मयीन विद्वत्तेच्या परिक्षेत्रांचे प्रतिबिंब गौरवग्रंथात दिसून येते.

गौरवग्रंथांच्या माध्यमातून अभ्यासविषय झालेल्या आणि गौरवास पात्र ठरविलेल्या अभ्यासकाची व्यक्तिगत जीवनाची परिघ यांची माहिती मिळते. संशोधनासाठी अशा अभ्यासकांच्या जीवनचरित्राची परिपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. चरित्रेतिहासाचा अवलंब करून लेखकाचा जीवनवृत्तांत, त्याची विश्वसनीयता, वाङ्मयीन कर्तृत्वाची विश्वसनीयता, रचनाकाव्याची निश्चितता इ. ग्रंथातून स्पष्ट होताना दिसते असे सु.रा. चुनेकर[१] यांना वाटते. उदा. 'खानविलकरांच्या शोधात' सारख्या ग्रंथातून जया दडकर यांनी व्यक्तिशोध घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये काही वाङ्मयउपासकांचे साहित्यक्षेत्रातील त्यांच्या कार्याचा आलेख दर्शविणारे व त्या निमित्ताने एकूण समीक्षा प्रांतातील वर्तमान मांडणारे गौरवग्रंथ दिसून येतात.[२] प्रस्तुत ठिकाणी काही निवडक गौरवग्रंथांची सूची मुद्दाम नोंदविलेली आहे. या सूचीतून मराठी वाङ्मयात भर घालणाऱ्या विविध गौरवग्रंथांचे स्वरूप स्पष्ट झाल्याचे दिसून येईल.

१) 'साहित्य आणि समाज' ( गो. मा. पवार गौरवग्रंथ ) संपा. नागनाथ कोतापल्ले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००७.

२) 'ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी' - डॉ. हे. वि. इनामदार गौरवग्रंथ, संपा. नि. ना. रेळेकर,ल. रा. नसिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ५ ऑक्टोबर १९९१.

३) 'आजचे नाटककार', संपा. डॉ. दत्तात्रय पुडे, डॉ. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, एप्रिल १९९५.

४) 'गो. म. कुलकर्णी यांची समीक्षा - परिचय आणि परामर्श', गो. म. कुलकर्णी गौरवग्रंथ, संपा.रत्नाकर बापूराव मंचरकर, प्रा. गो. म. कुलकर्णी गौरव समिती, मे १९९०.

५) 'धुळाक्षराकडून मूलाक्षराकडे', डॉ. व. दि. कुलकर्णी गौरवग्रंथ, संपा. व. दि. कुलकर्णी, डॉ. व. दि. कुलकर्णी गौरव समिती आणि सोहम प्रकाशन, पुणे, २३ ऑगस्ट १९९४.

६) 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार', वा. ल. कुलकर्णी गौरवग्रंथ, संपा. श्री. पु. भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडुलकर, अंजली कीर्तने, पॉप्युलर प्रकाशन व मौज प्रकाशन, मुंबई.

७) 'संशोधनाची क्षितिजे', डॉ. वि. भि. कोलते अमृतमहोत्सवी गौरवग्रंथ, अमेय प्रकाशन, नागपूर, २२ जून १९८५.

८) 'साहित्य विचार', रा. श्री. जोग गौरवग्रंथ, संपा. द. ना. गोखले, स. शि. भावे, स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६४.

९) 'साहित्य-समीक्षा', कुसुमाग्रज गौरवग्रंथ, संपा. ग. वि. अकोलकर, बा. वा. दातार, सार्वजनिक वाचनालय, नासिक, १९७६.

१०) 'साहित्य आणि नाट्य : काही समस्या', डॉ. रा. शं. वाळिंबे गौरवग्रंथ, संपा. डॉ. भीमराव कुलकर्णी, डॉ. सौ. नीना जेस्ते, जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे, डिसेंबर १९७४.

११) 'संस्कृतिसुगंध', विश्वनाथ त्र्यंबक शेटे गौरवग्रंथ, जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे, ऑगस्ट १९८२.

१२) 'नवसमीक्षा' ( काही विचारप्रवाह ), संपा. गो. म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ऑगस्ट - १९८२.

१३) 'वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन', गुरूवर्य डॉ. दु. का. संत गौरवग्रंथ, संपा. र. बा. मंचरकर, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, १७ मे १९८७.

१४) 'साहित्यविचार आणि समाजचिंतन', प्रा. गं. बा. सरदार षष्ठ्यब्दीपूर्ती गौरवग्रंथ, संपा. भा. शं. भणगे, ओरिएंट लॉगमन्स लिमिटेड, मुंबई, ऑक्टोबर १९६८.

१५) 'तौलानिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा', प्रा. म. द. हातकणंगलेकर गौरवग्रंथ, संपा. डॉ. प्रा. चंद्रशेखर जहागीरदार, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, (पुणे) (वितरण) १९९२.

१६) 'संत साहित्य : अभ्यासाच्या काही दिशा', डॉ. मु. श्री. कानडे गौरवग्रंथ, संपा. कल्याण काळे, रा. शं. नगरकर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, नोव्हेंबर १९९२.

१७) 'संगम', डॉ. पंडित आवळीकर गौरवग्रंथ, संपा. डॉ. विजया तेलंग, अभंग प्रकाशन, कोल्हापूर, मे १९९१.

१८) 'महाराष्ट्राची सत्त्वधारा', (डॉ. रा. चिं. ढेरे अभिनंदन ग्रंथ ), संपा. गो. म. कुलकर्णी, वि. त्र्यं. शेटे, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १८ ऑक्टोबर १९८१.

१९) 'ज्ञानवेध', डॉ. गं. ना. मोरजे गौरवग्रंथ, संपा. डॉ. पंडितराव पवार, श्री. गोपाळ मिरीकर, डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, मोरया प्रकाशन, डोंबिवली, १९९१.

वरील गौरवग्रंथांची सूची लक्षात घेता असे दिसते की, मराठीमध्ये गौरवग्रंथांची दीर्घ परंपरा नसली तरी वैशिष्ट्यपूर्ण नक्कीच आहे. वाङ्मयीन पर्वाच्या विशिष्ट टप्प्यावर असे गौरवग्रंथ निर्माण झालेले आहेत आणि काही वैशिष्ट्यपूर्ण गौरवग्रंथांनी स्वत:चे अस्तित्त्व सिद्ध केलेले आहे.

गौरवग्रंथ प्रामुख्याने संपादित स्वरूपात आहेत. बहुतेक सर्व गौरवग्रंथ अभ्यासविषय झालेल्या आणि गौरवाचे भाग्य लाभलेल्या वाङ्मय उपासकांच्या विद्यार्थ्यांनी संपादित केलेले आहेत. या मान्यवर गुरूवर्यांनी आपल्या विद्यार्थ्यांना साहित्याच्या अध्ययनाची दीक्षा दिलेली आहे. त्यांच्या साहित्यविषयक विचारांना आकार दिलेला आहे. तसेच साहित्याचा सखोल व समतोल व्यासंग कसा करावा यांविषयी मार्गदर्शन केलेले आहे. अशा गुरूचे ऋण कसे फेडणार ? ऋण फेडण्याचे अनेक मार्ग असतीलही परंतु काही विद्यार्थ्यांच्या कल्पनेतूनच साहित्य व समीक्षा आणि त्याचबरोबर व्यक्तिगत जीवन आणि वाङ्मयीन कर्तृत्व यांना दिशा देणाऱ्या साहित्य विचार[३] यासारख्या ग्रंथाची रचना झालेली आहे.

सदर गौरवग्रंथांमधून समीक्षकांच्या व्यक्तिगत जीवनाचा गौरव तर केलेलाच आहे पण त्याहूनही त्यांच्या वाङ्मयीन कार्याचा गौरव करून त्यांना गौरवांजली समर्पित केलेली दिसून येते.

## ४. गौरवग्रंथांच्या प्रेरणा :-

गौरवग्रंथ निर्मितीचा विचार करता त्यामागील प्रेरणांचा विचार महत्त्वाचा ठरतो. गौरवग्रंथ हे आगळे वेगळे विशेषण लक्षात घेता 'यथोचित गौरव' या प्रमुख प्रेरणेच्या बळावरच गौरवग्रंथांची निर्मिती झालेली आहे. अध्ययन आणि अध्यापन या दोन्ही क्षेत्रात कार्य करणाऱ्या अभ्यासकांवर बहुतेक गौरवग्रंथ निर्माण झालेले आहेत. अशा सर्व गौरवग्रंथांचा विचार करता हे ग्रंथ संपादन स्वरूपात आढळून येतात. गौरवग्रंथांचे भाग्य ज्यांना लाभलेले आहे अशा मान्यवर गुरूवर्यांच्या विद्यार्थ्यांनी हे ग्रंथ संपादित केलेले आहेत. या गुरूवर्यांनी विद्यार्थ्यांना साहित्याची दिशा दाखविली, साहित्याच्या सखोल व्यासंगासाठी मार्गदर्शन केले. अशा गुरूचे ऋण कसे फेडायचे ? यांमधूनच गौरवग्रंथ संकल्पना उदयाला आलेली आहे. 'यथोचित गौरव' आणि 'ऋणातून उतराई होणे' या प्रमुख प्रेरणांच्या बळावरच गौरवग्रंथांची निर्मिती झालेली आहे, हे दिसून येते. 'साहित्य विचार' या रा. श्री. जोग यांच्या गौरवग्रंथामध्ये

(संपादकीयमध्ये) प्रारंभीच म्हटले आहे - ''गौरवग्रंथ म्हणजे शिष्यांनी गुरूचरणांवर आदराने व कृतज्ञतेने वाहिलेली फुलांची ओंजळ आहे.''[४] यातून योग्यवेळी आपल्या गुरूचा सन्मान अशा निमित्ताने करावा, ही प्रेरणा दिसून येते. श्री. रा. श्री. जोग यांचे ऋण फेडण्याच्या हेतूने त्यांच्या काही शिष्यांनी जोग सरांचे एकूणच साहित्य कर्तृत्व स्पष्ट करताना साहित्यचर्चा करणारा गौरवग्रंथ निर्माण केलेला आहे.

स्वत: अखंड विद्यार्थी आणि निष्ठावंत अध्यापक म्हणून कार्य करणाऱ्या गुरूचा 'यथोचित गौरव' या संकल्पनेतून गौरवग्रंथांची निर्मिती झालेली आहे. काही गौरवग्रंथांची निर्मिती ही 'गौरवमूर्तींच्या' विशिष्ट वयाच्या टप्प्यावर सद्भाव व्यक्त करण्यासाठी झालेली आहे. षष्ठ्यब्दीपूर्ती, एकाहत्तरी, अमृतमहोत्सवी किंवा सेवानिवृत्ती अशा निमित्ताने गौरवग्रंथांची निर्मिती करण्यात आलेली आहे, हे दिसून येते.

'साहित्याचा अभ्यास'[५] या गौरवग्रंथामध्ये गुरूच्या ज्ञानसाधनेविषयीचा सद्भाव ग्रंथाच्या रूपाने व्यक्त करणे हा सामूहिक मार्ग अवलंबिलेला आहे, हे दिसून येते. गुरूविषयी वाटणारा आदर आणि साहित्य व समीक्षा या क्षेत्रांमधील त्यांच्या योगदानाचा गौरव या ग्रंथांमधून केलेला दिसून येतो.

वि. वा. शिरवाडकर तथा तात्यासाहेब (कुसुमाग्रज) यांच्या षष्ठ्यब्दिपूर्ती निमित्त 'साहित्य-समीक्षा'[६] हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे. शिरवाडकरांनी २७ फेब्रुवारी १९७२ या दिवशी वयाच्या एकसष्ठाव्या वयात पदार्पण केले त्या निमित्ताने त्यांच्या साहित्यिक, सामाजिक अन सांस्कृतिक कार्याचा गौरव करण्याच्या निमित्ताने हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे. या गौरवग्रंथ निर्मितीमागे 'षष्ठ्यब्दिपूर्ती' हीच प्रमुख प्रेरणा दिसून येते.

अध्यापन क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेनंतर १९८० मध्ये धुळे येथील विद्यावर्धिनी सभेच्या 'वाङ्मय आणि वाणिज्य' महाविद्यालयामध्ये ह. श्री. शेणोलीकर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने 'नवसमीक्षा'[७] नामक गौरवग्रंथ त्यांना समारंभपूर्वक अर्पण करण्यात आलेला आहे. ह. श्री. शेणोलीकर यांच्या विषयी असणारी व्यक्तिगत आत्मीयता आणि त्याचबरोबर त्यांची तत्त्वनिष्ठ, व्यासंगशील आणि समाजाभिमुख वृत्तीचा गौरव हीच या गौरवग्रंथामागील प्रमुख प्रेरणा आहे.

एकूणच पाहता गौरवग्रंथांची प्रेरणा जरी भिन्न असली तरी त्यातील 'गौरवाची भावना' यामध्ये महत्त्वपूर्ण आहे. गौरवमूर्तींच्या महान साहित्यिक, सामाजिक नि सांस्कृतिक कार्याचा गौरव व त्यांचे शुभचिंतन आणि समीक्षाविषयक बहुविध विषयांना एकाचवेळी न्याय देणे हाच गौरवग्रंथांचा आशय आहे. यथोचित गौरवाबरोबरच साहित्य-समीक्षेतील विविध अंगांचा या निमित्ताने स्वतंत्र व सांगोपांग विचार व्हावा या उद्देशाने अशा प्रकारची ग्रंथनिर्मिती झालेली आहे. केवळ गौरवपूर्ण लिहिलेल्या ग्रंथांचे आयुष्य काहीसे अल्प ठरू शकते; हे लक्षात घेऊन ग्रंथाला शाश्वतता प्राप्त व्हावी हा हेतू लक्षात घेऊन त्यानिमित्ताने साहित्य व समीक्षा क्षेत्रातील वर्तमान घडामोडींचे प्रतिबिंब या ग्रंथांमध्ये स्पष्ट झालेले आहे. त्याचप्रमाणे

'गौरवमूर्तींनी' साहित्यक्षेत्राला काय योगदान दिले आहे ? याचा आलेख गौरवग्रंथांमधून दर्शविला जातो. त्यामुळे व्यापक साहित्यक्षेत्रामध्ये एखाद्या व्यक्तीचे विशिष्टत्त्व लक्षात घेता येते.

वा. ल. कुलकर्णी यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त मौज प्रकाशन व पॉप्युलर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार'[८] हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे. मराठी वाङ्मयाचे अध्यापक व समीक्षक म्हणून त्यांनी केलेले कार्य तसेच वाङ्मयाच्या अध्यापनाचे प्रश्न आणि विविध वाङ्मयप्रकार यांची चिकित्सा सदर ग्रंथातून केलेली आहे.

एकूणच सदर गौरवग्रंथांच्या प्रेरणा या भिन्न आहेत. परंतु व्यक्तिगत जीवनाचे आकलन करून त्याचे विश्लेषण यामध्ये आलेले आहे. गौरवास पात्र ठरविलेल्या या व्यक्तींचे व्यक्तिगत पातळीवर माणूस म्हणून होणारे आकलन यामध्ये दिसून येते. व्यक्तीचा 'माणूस' व 'कलावंत' असण्याचा शोध घेण्याची जिज्ञासा या प्रेरणेतून त्यांचे व्यक्तिगत जीवन व वाङ्मयीन कर्तृत्व यांचा वेध घेतल्याचे दिसून येते.

अलिकडच्या गौरवग्रंथांची नावे लक्षात घेतली असता, उदा. 'साहित्य आणि समाज', 'साहित्य, समाज आणि संस्कृती', 'साहित्य समीक्षा' इ. हे गौरवग्रंथ व्यक्तीच्या निमित्ताने सिद्ध झाले असले तरी देखील ती केंद्रबिंदू न करता साहित्याला महत्त्व दिल्याचे दिसून येते.

एकूणच वरील सर्व प्रमुख प्रेरणांच्या बळावरच गौरवग्रंथांची निर्मिती झालेली आहे.

गुरूवर्य वा. ल. कुलकर्णी यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त म्हणजेच अमृतमहोत्सवानिमित्त एक गौरवग्रंथ प्रसिद्ध करावा असे त्यांचे विद्यार्थी, स्नेही यांच्या औपचारिक सभेत ठरले. प्रत्यक्ष ग्रंथ सिद्ध होण्यासाठी काही अपरिहार्य कारणास्तव एक वर्षाचा विलंब लागलेला असला तरी मौज प्रकाशन व पॉप्युलर प्रकाशन यांच्या संयुक्तविद्यमाने सदर ग्रंथ सिद्ध झालेला आहे. प्रा. वा. ल. कुलकर्णी हे मराठी वाङ्मयाचे नामवंत अध्यापक आणि समीक्षक आहेत. मराठी समीक्षेवर आणि मराठी वाङ्मयाच्या अध्ययन-अध्यापनावर प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचा प्रभाव पडलेला आहे. मराठी वाङ्मयाचे अध्यापक म्हणून आणि मराठी वाङ्मयाचे समीक्षक म्हणून त्यांनी आजपर्यंत जे कार्य केले त्याचा उचित गौरव करण्यासाठी वाङ्मयाच्या अध्यापनाचे प्रश्न आणि विविध वाङ्मयप्रकार यांची चिकित्सा करणारा 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार' हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे.

एकूणच वरील सर्व गौरवग्रंथांचा विचार करता 'यथोचित गौरव' हीच प्रमुख प्रेरणा आहे आणि या प्रेरणेच्या बळावरच हे गौरवग्रंथ सिद्ध झालेले आहेत.

**५. गौरवग्रंथांची परंपरा :-**

गौरवग्रंथ हा एक आगळा वेगळा वाङ्मय प्रकार अलिकडच्या कालखंडात दिसून येतो. राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींच्या तुलनेत साहित्यक्षेत्रातील व्यक्तींचे गौरवग्रंथ अल्पप्रमाणात आहेत,

असे दिसून येते. परंतु असे अल्पप्रमाण असूनही यातील गौरवाची भावना लक्षात घेतली असता बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू तसेच एकूण वाङ्मयीन कर्तृत्व आणि समीक्षादृष्ट्या अनेकविध विषयांना एकाचवेळी न्याय दिलेला आहे.

या गौरवग्रंथांची मराठीमध्ये दीर्घ परंपरा नाही. परंतु वाङ्मयीनदृष्ट्या या गौरवग्रंथांनी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्त्व सिद्ध केलेले आहे. या परंपरेतील काही गौरवग्रंथांचा इथे आढावा घेतलेला आहे. तसेच त्यांचे विशेष वेगळेपण नमूद केलेले आहे.

## ५.१ वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन ( गुरूवर्य दु. का. संत गौरवग्रंथ ) :-

गुरूवर्य दु. का. संत यांच्या बहुमुखी व्यक्तिमत्त्वाचे आणि वाङ्मयीन कर्तृत्वाचे विविधांगी दर्शन तसेच वाङ्मयाच्या महाविद्यालयीन अध्यापनाचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. हा गौरवग्रंथ व्यक्तिपरिचयात्मक असावा तसाच तो दु. का. संत यांच्या आवडीच्या विषयातील मोलाचा संदर्भ ग्रंथ आहे ; अशाच पद्धतीने या गौरवग्रंथाची आखणी केलेली आहे. साहित्याचे अध्यापन आणि साहित्यमीमांसा ही दु. का. संत जीवन कार्याची दोन क्षेत्रे आहेत आणि त्यांनाच जोडणारा 'वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन'[९] हा या गौरवग्रंथाचा केंद्रीय विषय आहे. मराठी वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन या विशेष संदर्भात याचा विचार केलेला आहे.

पदवी व पदव्युत्तर पातळ्यांवर मराठी भाषा व वाङ्मय यांचे अध्यापन सुरू होऊन कित्येक वर्षे लोटलेली आहेत. महाराष्ट्रातील प्रमुख सहाही विद्यापीठात मराठी विभाग कार्यरत आहेत. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील काही विद्यापीठातही मराठी विभाग आहेत. पण मराठी भाषा व वाङ्मय यांच्या विद्यापीठातील अध्यापनाचा अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, अडचणी, प्रश्न, संशोधनाचे हेतू यांची व्हावी तशी चर्चा मात्र झालेली दिसत नाही. आणि या विषयाला जी दिशा मिळालेली आहे तीही काहीशी दिशाहीनच आहे. महाविद्यालयीन अध्यापनाची जी शिस्त तसेच परंपरा आहे ती महाविद्यालयीन अध्यापनाला लाभलेली नाही हेच येथे लक्षात घेतलेले आहे.

अध्यापन हे स्वतंत्र व्यासंग क्षेत्र आहे. त्याच्या दृष्टिकोणातून केलेले वाङ्मय विवेचन हेच या ग्रंथाचे वेगळेपण आहे. अध्यापन क्षेत्रात एक व्यापक स्वरूपाचा संदर्भ ग्रंथाचे स्थान प्रस्तुत गौरवग्रंथाला लाभलेले आहे. दु. का. संत यांच्या शब्दात सांगायचे तर, "गौरव हे निमित्त, ग्रंथनिर्मिती महत्त्वाची आहे."[१०] एक नामवंत अध्यापक आणि साहित्यमीमांसक म्हणून दु. का. संत सर्वपरिचित आहेत. साहित्य, ललितकथा, समाज आणि संशोधन ही त्यांच्या वाङ्मयीन विद्वत्तेची असणारी परिक्षेत्रे प्रस्तुत गौरवग्रंथात प्रतिबिंबीत झालेली आहेत. मराठी साहित्यमीमांसेची अनेक दुर्लक्षित क्षेत्रे या गौरवग्रंथातून विस्तीर्ण झालेली आहेत.

असा दुर्लक्षित विषय नियोजनपूर्वक मांडलेला आहे. या विषयातील पायाभूत मुद्द्यांची मांडणी व चर्चा 'वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन' या दु. का. संत यांच्यावरील गौरवग्रंथात केलेली आहे. या गौरवग्रंथांतील आशय, लेख इ. रूपरेषेचा पुढीलप्रमाणे वेध घेतलेला आहे.

### ५.१.१ व्यक्तिदर्शन :-

या विभागामध्ये दु. का. संत यांच्या व्यक्तिमत्वाचे आणि वाङ्मयीन कर्तृत्वाचे विविधांगी दर्शन घडविणारे पाच लेख आलेले आहेत. 'आमचे ताता' हा सौ. प्रियदर्शनी ठकार यांचा लेख. दु. का. संत यांच्या त्या लाडक्या कन्या आहेत. आपल्या 'तातां'चे भावनांनी भिजलेले, आपुलकीने रंगलेले हृद्य दर्शन त्यांनी घडविले आहे. त्यांच्याकडून झाडांना दिली जाणारी शाबासकी, कॅरम बोर्डवर उभा राहण्याचा पुरवला जाणारा हट्ट, लग्नाच्यावेळी तिचे नाव बदलू नका असा व्याह्यांना केलेला आग्रह, लेकी-सुनांना दिलेली समान वागणुक, स्त्री स्वातंत्र्याचे आग्रही, मराठी साहित्य व समाज यांच्यातील स्त्रीच्या स्थानाचा अभ्यास करणारे अभ्यासक आणि त्यांचे वेगळेपण येथे प्रकट झालेले आहे.

'गुरूवर्य डॉ. दु. का. संत - माझे मार्गदर्शक' या लेखात गोपीनाथ कोल्हापूरे यांचे विचार आलेले आहेत. संशोधक विद्यार्थ्यांच्या भूमिकेतून त्यांनी दु. का. संत यांच्या संशोधन विषय निवडण्याची खासियत स्पष्ट केलेली आहे. विद्यार्थ्यांना तयार विषय न देता त्यांना तो स्वत: शोधायला लावणे व त्यासाठी आवश्यक ते सहाय्य करणे हीच त्यांची पद्धती स्पष्ट केलेली आहे.

### ५.१.२ वाङ्मयाचे अध्यापन, तात्त्विक आणि व्यावहारिक विचार :-

या विभागात अध्यापनाची प्रकृती व तिचे महाविद्यालयीन पातळीवरील विशेष लक्षात घेतलेले आहेत. वाङ्मयाच्या अध्यापनाचे तत्त्व, तंत्र आणि समकालीन वास्तव यांचा विचार मांडणारे सुधाकर देशपांडे, प्राचार्या लीला पाटील, प्राचार्य व. सा. रोकडे, द. ता. भोसले यांचे लेख आलेले आहेत.

### ५.१.३ वाङ्मयाचे अध्यापन काही परिक्षेत्रे :-

या विभागात निरनिराळी क्षेत्रे व पातळ्या यांना स्पर्श करणाऱ्या भाषाविज्ञान, समीक्षा, वाङ्मयेतिहास, लोकसाहित्य आणि लेखकाचा अभ्यास यांच्या अध्यापनाची वैशिष्ट्ये उलगडून दाखविलेली आहेत.

### ५.१.४ वाङ्मयाचे प्रकारनिष्ठ अध्यापन :-

या विभागात एकूण सात लेख आलेले आहेत. कविता, कथा, कादंबरी, नाटक, वैचारिक लेखन या पायाभूत वाङ्मयप्रकारातील साहित्यकृतीच्या अध्यापनाचा विचार करणारे पाच लेख आहेत.

एकूणच या गौरवग्रंथाच्या माध्यमातून वाङ्मय आणि समाज तसेच संस्कृती याचे अभ्यासक म्हणून दु. का. संत यांचा गौरव केलेला आहे. आणि त्याचबरोबर वाङ्मयाच्या महाविद्यालयीन अध्यापनाचे तंत्र व दिशा स्पष्ट केलेली आहे.

गौरवग्रंथांच्या समारोपात लेखक परिचय व संदर्भ सूची दिलेली आहे.

## ५.२ साहित्य व समीक्षा ( कुसुमाग्रज गौरवग्रंथ) :-

श्री. विष्णू वामन तथा तात्यासाहेब शिरवाडकर ( कुसुमाग्रज ) यांच्या षष्ठ्यब्दिपूर्तीनिमित्त हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे. २७ फेब्रुवारी १९७२ या दिवशी कुसुमाग्रजांनी वयाच्या एकसष्ठाव्या वर्षात पदार्पण केले. त्या निमित्त त्यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव त्यांचे शुभचिंतन करण्यासाठी भव्य सत्कार सोहळा आयोजित करावा अशी इच्छा अनेक स्नेही व चाहत्यांनी व्यक्त केली. परंतु स्वत: कुसुमाग्रजांनी याला विरोध दर्शविला. गौरव सोहळ्याचाच एक भाग म्हणून समीक्षा विषयक लेखांचा संग्रह 'साहित्य व समीक्षा'[११] प्रकाशित करण्यात आला आहे. समीक्षा आणि त्याचबरोबर कुसुमाग्रजांच्या काव्य, नाटक, कादंबरी इ. ललित साहित्य व समीक्षा विषय विविध अंगोपांगांचा स्वतंत्र विचार आलेला आहे.

या गौरवग्रंथात वा. ल. कुलकर्णी, व. दि. कुलकर्णी, कवी बा. भ. बोरकर यांच्या व्याख्यानांचा ( लेख स्वरूपात ) समावेश केलेला आहे. समीक्षाविषयक लेख पहिल्या विभागात आलेले आहेत तर वि. वा. शिरवाडकर यांच्या साहित्याची समीक्षा करणारे लेख दुसऱ्या भागात आलेले आहेत.

'साहित्य विचार' या ग्रंथाच्या तिसऱ्या विभागात कुसुमाग्रजांच्या साहित्याच्या संदर्भातील अध्यक्षीय भाषणे तसेच लेख यांची समीक्षा येथे आलेली आहे. गौरवग्रंथांच्या शेवटी अनघा थत्ते यांची कुसुमाग्रजांच्या काव्यसौंदर्याचे दर्शन घडविणारी कविता घेतलेली आहे.

एकूणच साहित्य व समीक्षा हा गौरवग्रंथातून वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या व्यक्तिगत जीवन तसेच वाङ्मयीन कर्तृत्व याबरोबरच अनेकविध समीक्षा विषयांना न्याय दिलेला आहे.

## ५.३ नवसमीक्षा ( ह. श्री. शेणोलीकर गौरवग्रंथ ) :-

अध्यापन क्षेत्रातील प्रदीर्घ सेवेनंतर इ. स. १९८० मध्ये धुळ्याच्या विद्यावर्धिनी सभेच्या वाङ्मय आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये ह. श्री. शेणोलीकर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने धुळे येथे मराठी समीक्षेच्या संदर्भात एक चर्चासत्र आयोजित केले होते. 'या चर्चासत्रात वाचल्या गेलेल्या तसेच चर्चिल्या गेलेल्या निबंधात काही नव्याने भर घालून एक नवसमीक्षा विषयक लेखसंग्रह सिद्ध झालेला आहे. हा संग्रह ह. श्री. शेणोलीकर यांचा गौरवग्रंथ म्हणून त्यांच्या एकसष्ठीवेळी समारंभपूर्वक अर्पण करण्यात आलेला आहे.' [१२]

ह. श्री. शेणोलीकर यांच्याविषयी असणारी व्यक्तिगत आत्मियता आणि त्याचबरोबर त्यांची तत्त्वनिष्ठ, व्यासंगशील, समाजाभिमुख वृत्तीचा गौरव हीच नवसमीक्षक गौरवग्रंथांमागील प्रमुख प्रेरणा आहे.

ललित आणि ललितेतर दोन्ही प्रकारचे लेखन ह. श्री. शेणोलीकर यांनी केलेले आहे. मराठीचे प्राध्यापक व मराठी समीक्षा यांच्यातील ऋणानुबंध लक्षात घेऊनच प्रस्तुत गौरवग्रंथ साकारलेला आहे. 'नवसमीक्षा' या गौरवग्रंथांसाठी तसेच यातील लेखमालेसाठी लेखन तसेच सहकार्य करणारे सर्वच आजी-माजी प्राध्यापक आहेत.

'नवसमीक्षा' या गौरवग्रंथाची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. गौरवग्रंथाच्या पहिल्या विभागात ह. श्री. शेणोलीकर यांचा व्यक्तिगत परिचय आणि मान्यवरांच्या लेखमालेतून त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व विशद केलेले आहे. याच विभागाच्या शेवटी ह. श्री. शेणोलीकर यांची पुरूषोत्तम पाटील यांनी घेतलेली मुलाखत आलेली आहे.

गौरवग्रंथाच्या दुसऱ्या विभागात मराठी समीक्षा विषयक विविध विषयांवरील लेख आलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने मर्ढेकरपूर्वी आणि मर्ढेकरकृत साहित्यविचार, साहित्य व समीक्षा, साहित्यसमीक्षेचा उत्तम मार्ग, मार्क्सवादी समीक्षाविचार, समाजशास्त्रीय समीक्षा, मानसशास्त्रातील समीक्षा, आदिबंध व आदिबंधात्मक समीक्षा इ. विषयांचा समावेश आहे.

गौरवग्रंथाच्या तिसऱ्या आणि शेवटच्या विभागात मराठी वाङ्मयातील ग्रामीण व दलित प्रवाहातील साहित्य समीक्षेचे विवेचन आलेले आहे. त्याचबरोबर समीक्षा आणि संशोधन असा आगळा-वेगळा विषय स.ग.मालशे यांनी हाताळलेला आहे, हेच दिसून येते.

एकूणच पाहता 'मराठी टीका वाङ्मयातील नवा विचारप्रवाह' असा विषय लक्षात घेऊनच हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे.

### ५.४ साहित्यविचार ( रा. श्री. जोग गौरवग्रंथ ) :-

गुरूवर्य रा. श्री. जोग यांनी अनेक शिष्यांना साहित्याच्या अध्ययनाची दीक्षा दिली. त्यांच्या साहित्यविषयक विचारांना आकार दिला. तसेच साहित्याच्या सखोल व समतोल व्यासंग कसा करावा यांविषयी मार्गदर्शन केले. रा. श्री. जोग सेवानिवृत्त होत असताना हे सारे शिष्य त्यांचे ऋण कसे फेडावे ? ऋण फेडण्याचे अनेक मार्ग असतीलही परंतु त्यातील काही विद्यार्थ्यांना असे वाटले की, जोग सरांचे एकूण कर्तृत्व स्पष्ट करताना साहित्यचर्चा करणारा 'साहित्यविचार'[१३] हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे. सर्व विद्यार्थ्यांनी मिळून एक साहित्यसुमन रा. श्री. जोग यांना अर्पण केलेले आहे. हा साहित्यचर्चात्मक असा गौरवग्रंथ आहे. गौरवग्रंथाचे प्रमुख पाच विभाग दिसून येतात. यातूनच व्यक्तिदर्शन व समीक्षाविचार स्पष्ट केलेला आहे.

**५.४.१ व्यक्तिदर्शन :-**

गौरवग्रंथाच्या या पहिल्या विभागात रा. श्री. जोग यांचे व्यक्तिदर्शन आलेले आहे. 'मला दिसलेले जोग', 'एक परिणत व प्रसन्न व्यक्तिमत्व', 'रा. श्री. जोग चरित्रक्रम' हे अनुक्रमे शांता शेळके, मालती किर्लोस्कर व स. कृ. पाध्ये यांनी रा. श्री. जोग यांच्या व्यक्तिगत जीवनाचे दर्शन घडविलेले आहे. एक व्यक्ती म्हणून त्यांचे समाजातील जीवनदर्शन घडविले आहे.

**५.४.२ वाङ्मयदर्शन :-**

गौरवग्रंथाच्या या दुसऱ्या विभागात रा. श्री. जोग यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा पट उलगडून दाखविलेला आहे. 'निशिगंधाची कविता', 'प्रा. जोगांचा रसविचार', 'रा. श्री. जोग वाङ्मयदर्शन', 'सूची' हे अनुक्रमे वि. म. कुलकर्णी, प्र. शं. जोशी, द. न. गोखले, ललिता भावे इ. लेखनातून रा. श्री. जोग यांचे वाङ्मयदर्शन घडविले आहे.

**५.३.३ साहित्यचर्चा :-**

गौरवग्रंथाच्या या विभागामध्ये समीक्षा विचार आलेला आहे. 'अव्वल इंग्रजीतील वाङ्मयविषयक भूमिका', 'मराठी समीक्षा', 'अभिजात समीक्षा', 'वाङ्मयेतिहासाची रचना' इ. लेखांमधून समीक्षा विषयक विवेचन मांडलेले आहे.

**५.४.४ स्वरूपविचार :-**

गौरवग्रंथाच्या या विभागात साहित्याच्या स्वरूपाची चर्चा केलेली आहे. 'संतचरित्रातील साहित्य सौंदर्य', 'अर्वाचीन मराठी साहित्य व शिवविचार', 'ललित निबंध', 'नवकाव्यातील प्रतिभासृष्टी', 'गीत आणि भावगीत' इ. लेखांमधून साहित्याच्या स्वरूपाची चर्चा केलेली आहे.

**५.४.५ निर्मितीविचार :-**

गौरवग्रंथाच्या या शेवटच्या विभागात निर्मितीविचार आलेला आहे. 'साहित्याच्या भाषांतरातील समस्या','कलागर्भ', 'त्यांचे विकसन आणि कलाकृती', 'कलात्मक सत्याचे स्वरूप', 'ललित साहित्याचा सामाजिक परिणाम' इ. येथे विचार आलेला आहे.

एकूण पाहता 'साहित्य विचार' हा रा. श्री. जोग यांच्यावरील गौरवग्रंथात गौरवाची भावना केंद्रीय ठेवून जोग यांच्या विस्तृत वाङ्मयीन कर्तृत्वाचे दर्शन आणि समीक्षेतील साहित्यचर्चा, स्वरूपविचार, निर्मितीविचार मांडलेला आहे.

**५.५ साहित्य : अध्यापन आणि प्रकार ( वा. ल. कुलकर्णी गौरवग्रंथ ) :-**

वा. ल. कुलकर्णी यांनी मराठी वाङ्मयाची समीक्षा आणि अध्यापन दीर्घकाळ केलेले आहे. वाङ्मयाविषयी असणारे संवेदनशील नाते त्यांच्या समीक्षा लेखनातून प्रकट झालेले आहे. मुंबईच्या

विल्सन शाळेत व महाविद्यालयात आणि मराठवाडा व मुंबई या विद्यापीठात त्यांच्या अध्यापनातून वाङ्मयकलांचे प्रेम लाभलेले अनेक विद्यार्थी महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेले आहेत. त्यांच्यापैकी कित्येकजण आज अध्यापनाचे कार्य करीत आहेत. वा. ल. कुलकर्णी यांचे समीक्षा ग्रंथ अधुनिक समीक्षेमध्ये, ललित लेखकांमध्ये तसेच साहित्य अभ्यासकांमध्ये मान्यता पावलेले आहेत. वा. ल. कुलकर्णी यांच्या या वाङ्मयीन व शैक्षणिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी या हेतूने 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार'[१४] गौरवग्रंथ त्यांच्या शहात्तराव्या वाढदिवशी प्रकाशित करण्यात आलेला आहे.

गौरवग्रंथाच्या सुरुवातीलाच श्री. सुधीर रसाळ यांनी वा. ल. कुलकर्णी यांचा साहित्य समीक्षक व अध्यापक या नात्याने त्यांच्या विस्तृत वाङ्मयीन कर्तृत्वाचा मागोवा घेतलेला आहे. वा. ल. कुलकर्णी यांच्या मराठी समीक्षेची वैचारिक चौकट आणि पद्धती स्पष्ट केलेली आहे. विद्यापीठीय पातळीवरील आणि विशेषत: पदव्युत्तर पातळीवरील मराठी वाङ्मयाच्या अभ्यासक्रमाला आणि त्याचबरोबर वाङ्मयाला अध्ययन-अध्यापनाला दिलेली दिशा स्पष्ट केलेली आहे.

गौरवग्रंथाच्या संपादक मंडळाचा सदस्य या नात्याने सुधीर रसाळ यांनी प्रास्ताविकेत वा. ल. कुलकर्णी यांच्या एकूण वाङ्मयीन कार्याचे विहंगमावलोकन केलेले आहे. आधुनिक मराठी साहित्याच्या आणि विशेषत: समीक्षेच्या परंपरेतील वा. ल. कुलकर्णी यांच्या समीक्षेचे महत्त्व आणि मूल्य विशद केलेले आहे.

या गौरवग्रंथाचे दोन भाग आहेत. पहिल्या विभागात मराठी साहित्याच्या - महाविद्यालयीन व विद्यापीठीय अध्यापनाच्या प्रश्नाची मीमांसा केलेली आहे. साहित्य अध्यापनाची तत्त्वे व पद्धती, ललित वाङ्मयाचे अध्यापन, साहित्यसमीक्षेचे अध्यापन, प्राचीन मराठी वाङ्मयाचे अध्यापन व अध्ययन, वाङ्मयेतिहासाच्या अध्यापनातील काही प्रश्न, साहित्याचा अध्यापक : क्षमता आणि अपेक्षा इ. विषयांवर व्यासंगपूर्ण विवेचन आलेले आहे.

गौरवग्रंथाच्या दुसऱ्या विभागात साहित्यप्रकार संकल्पनेचा स्वतंत्र विचार आलेला आहे. साहित्यप्रकार : कविता, शोकान्तिका, सुखात्मिकेचा रूपबंध, कादंबरी, कथा, ललित निबंध, विनोद इ. साहित्यप्रकारांची मीमांसा केलेली आहे.

### ५.६ साहित्य व समाज ( गो. मा. पवार गौरवग्रंथ ) :-

मराठी वाङ्मयाच्या दर्जेदार अभ्यासपूर्ण परंपरेतील एक महत्त्वपूर्ण गौरवग्रंथ 'साहित्य व समाज' हा आहे. गौरवार्थ व्यक्तीचा अभ्यासविषय केंद्रस्थानी ठेवून लिहून घेतलेल्या लेखांच्या स्वरूपात हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे. गो. मा. पवार यांच्यावर हा गौरवग्रंथ सिद्ध झालेला आहे. नीलिमा गुंडी[१५] यांनी वाचकांसाठी या गौरवग्रंथाचा परिचय करून दिलेला आहे.

या गौरवग्रंथाची विभागणी चार विभागात झालेली आहे. पहिल्या विभागात संपा. नागनाथ कोत्तापल्ले यांनी विषयाचा आवाका स्पष्ट केलेला आहे. विषयाचे स्वरूप निश्चित करणारी दीर्घ प्रस्तावना सुरूवातीलाच आलेली आहे. यानंतर साहित्य व समाज यांविषयीचे तात्त्विक आणि उपयोजित स्वरूपाचे विवेचन अभ्यासपूर्ण १३ लेख आलेले आहेत. साहित्य व समाज यांच्यातील विविध नातेसंबंधांचा इथे वेध घेतलेला आहे. 'साहित्याचे समाजशास्त्र' हा भालचंद्र नेमाडे यांचा लेख सुरुवातीलाच आलेला आहे. 'जे वाचले ते साहित्य' अशी व्याख्या गृहीत धरलेली आहे. साहित्यनिर्मिती ही मानवाच्या विस्तृत वांशिक, सांस्कृतिक नकाशाचाच एक भाग म्हणून पाहिले आहे. साहित्यनिर्मितीशी संलग्न अशा सामाजिक घटकांमध्ये प्रकाशन, वितरण, समीक्षण, वाचन या प्रक्रियेतील सर्वांचा सहभाग येथे विचारात घेतलेला आहे.

वसंत पळशीकर यांचा 'समाज, संस्कृती आणि साहित्य' हा लेख विभिन्न समाजव्यवस्थेच्या काळात साहित्याची जी नैतिक जबाबदारी लक्षात आणून देणारा आहे. व्यापक ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातून लिहिलेल्या या लेखातून ' लेखकाच्या आत्मनिष्ठेमध्ये अंगभूत एक समाजाभिमुखता असते.' हेच स्पष्ट केलेले आहे आणि हेच महत्त्वपूर्ण भान जोपासलेले आहे. संतसाहित्यातील सामाजिकतेचा संदर्भ लक्षात आणून देणारा सदानंद मोरे यांचा लेख साहित्य आणि समाज यांच्यातील संबंध स्पष्ट करताना निर्माण होणाऱ्या उणीवा स्पष्ट करणारा आहे. त्यातून होणारी कालविपर्यासाची गफलत लक्षात आणून दिलेली आहे. संतांच्या सामाजिक कार्याची ठळक वैशिष्ट्ये दाखविणारा हा लेख आहे. संतांच्या सामाजिक समतेची बलस्थाने या लेखातून स्पष्ट केलेली आहेत. 'इंग्रजी राजवट आणि मराठी साहित्य'[१६] हा गो. म. कुलकर्णी यांचा लेख महाराष्ट्रातील आधुनिक प्रबोधनाचा वेध घेणारा आहे. महाराष्ट्राच्या प्रबोधन युगातील सांस्कृतिक संघर्षाचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे.

गौरवग्रंथाच्या दुसऱ्या विभागात विषयांच्या विविध पैलूंचा वेध घेतलेला आहे. 'दलित साहित्य' (बाबूराव बागूल), 'कला साहित्य' (रा. ग. जाधव), 'कृषिजन साहित्य' (राजन गवस), 'स्त्रीवादी दृष्टिकोण' (विलास खोले), 'महानगरीय जाणिवा' (अविनाश सप्रे), 'नाटक' ( रविंद्र किंबहुने), 'भाषा' ( सुमन बेलवलकर ), 'बाजारपेठ' ( दिगंबर पाध्ये) आणि 'रंजनवादी कादंबरी' ( नागनाथ कोत्तापल्ले) या विषयावरील लेख । आलेले आहेत.

गौरवग्रंथाच्या तिसऱ्या विभागात गो. मा. पवार यांची प्रकट मुलाखत विश्वनाथ शिंदे, मनोहर जाधव आणि राजन गवस यांनी घेतलेली आहे. गो. मा. पवार सरांची जडणघडण, त्यांचे कार्यकर्तृत्व आणि त्यांची वाङ्मयविषयक भूमिका स्पष्ट झालेली आहे. साहित्यातील जीवनपोषक मूल्यांवर भर देतानाच ते भाषेतील सर्जनतेकडे कधीच दुर्लक्ष करीत नाहीत हेच येथे दिसून येते. ते साहित्यातील सामाजिकता माहितीच्या रूपात न देता आशयद्रव्याच्या स्वरूपात देतात याचेच विवेचन । आलेले आहे.

गौरवग्रंथाच्या शेवटच्या विभागात सुधीर रसाळ आणि रोहिणी तुकदेव यांचे गो.मा. पवार यांच्याविषयीचे व्यक्तिचित्रणात्मक लेख आलेले आहेत. तीन परिशिष्टामध्ये गो. मा. पवार यांच्या व्यक्तिगत परिचय, साहित्यसूची आणि पीएच.डी. पदवीप्राप्त विद्यार्थ्यांच्या अभ्यासविषयाची सूची दिलेली आहे.

प्रस्तुत गौरवग्रंथ एक महत्त्वाच्या तात्त्विक विषयाचा आधारग्रंथ आहे हे दिसून येते. या गौरवग्रंथात साहित्य व समाजविषयक विचारमंथन आलेले आहे. मराठीमध्ये वा. ब. पटवर्धन, डॉ. केतकर, राजवाडे इत्यादींनी ज्या विषयावर सखोल विवेचन केलेले आहे त्या साहित्य व समाज या घटकांचा इथे प्राधान्याने विचार केलेला आहे.

एकूण 'साहित्य आणि समाज' हा गौरवग्रंथ म्हणजे शिक्षण क्षेत्रात व वाङ्मयीन कार्यात जीवन व्यतीत करणाऱ्या गो. मा. पवार यांचे गुरूऋण जपण्याचा उल्लेखनीय प्रयत्न ठरलेला आहे.

### ५.७ समीक्षा विविधा ( लीला गोविलकर गौरवग्रंथ ) :-

'समीक्षा विविधा'[१७] हा लीला गोविलकर यांच्या गौरवार्थ सिद्ध झालेला गौरवग्रंथ आहे. गेली अनेक वर्षे लीला गोविलकर यांची महाराष्ट्रात वैशिष्ट्यपूर्ण ओळख आहे. साहित्यशास्त्र आणि व्याकरण यांमध्ये त्यांनी मिळविलेला अभ्यास सर्वज्ञात आहे. त्यांच्या एकूणच वाङ्मयीन कर्तृत्व आणि विचारविश्व यांचा परिचय या गौरवग्रंथात करून दिलेला आहे.

अहमदनगरच्या पेमराज सारडा या महाविद्यालयातून लीला गोविलकर सेवानिवृत्त होत असताना त्यांच्याविषयी सद्भाव, मैत्रभाव वाटणाऱ्या मंडळींनी एकत्र येऊन हा गौरवग्रंथ सिद्ध केलेला आहे. विविध विषयांवर अभ्यासिकांचे लेख मिळवून लीला गोविलकर यांच्या गौरवार्थ हा प्रातिनिधिक लेखसंग्रह संपादित करण्यात आलेला आहे.

या ग्रंथातील समीक्षाविषयक लेखन करणाऱ्या अभ्यासिका वेगवेगळ्या पिढ्यांमधील आहेत. सर्व अभ्यासिकांनी समीक्षा-क्षेत्रामध्ये स्वत:चे वेगळे स्थान प्राप्त केलेले आहे. यामध्ये काही ज्येष्ठ अभ्यासिकांचा समावेश आहे आणि त्याचबरोबर नवोदित लेखिकांना संधी मिळालेली आहे. प्रगल्भ ज्ञान आणि चिकित्सक अभ्यास करणाऱ्या लेखिकांबरोबरच हौसेने लेखन करणाऱ्या लेखिकांचाही या प्रांतात प्रवेश झालेला आहे.

अनेकविध विषयांचे आणि त्याचप्रमाणे विविध दृष्टिकोण असणारे व एकूणच समीक्षेचा आवाका स्पष्ट करणारे हे लेख एकत्र करण्याचे मुख्य प्रयोजन स्त्रियांच्या समीक्षालेखनाचे प्रातिनिधिक चित्र उभे करणारे आहे. समीक्षा लेखनातील स्त्रियांच्या आजवरच्या प्रगतीचा आलेख स्पष्ट केलेला आहे. मराठी भाषा व साहित्याचे अध्यापन करणाऱ्या स्त्रियांच्या वाटचालीचा एकूणच पट उलगडून दाखविलेला आहे. एकूणच साहित्याभ्यास आणि समीक्षा या क्षेत्रातील महिलांचे स्थान निश्चित केलेले आहे. स्त्रियांच्या

प्रातिनिधिक लेखांचा संग्रह आणि अलिकडेच विकसित झालेला स्त्रीवादी दृष्टिकोण यांच्यातील प्रभाव येथे दिसून येतो.

गौरवग्रंथाची विभागणी प्रामुख्याने तीन विभागात झालेली आहे. पहिल्या विभागात मान्यवर स्त्री समीक्षकांचे अभ्यासपूर्ण २१ लेख आलेले आहेत. गौरवग्रंथाच्या दुसऱ्या विभागात लीला गोविलकर यांचे व्यक्तिगत जीवन आणि एकूणच वाङ्मयीन कर्तृत्व दिसून येते, तर गौरवग्रंथाच्या तिसऱ्या विभागात गौरवसमिती विषयक विचार आणि कार्य आलेले आहे, हे दिसून येते.

'संत कवयित्रींची कविता' या पहिल्याच लेखामध्ये सुषमा करोगल यांनी महाराष्ट्र संस्कृती सुधारणा आणि संवर्धनात संत संप्रदायाचे जे कार्य केले आहे यातील संत कवयित्रींची आणि त्यांच्या काव्यलेखनाची समीक्षा केलेली आहे. संत कवयित्री या शब्दातील संतत्त्वाबरोबरच त्यांचे कवित्त्व येथे उलगडून दाखविलेले आहे. संतत्त्वाचा आविष्कार करणारी ही कविता काव्याबरोबरच एक श्रेष्ठ परंपरेची निर्माती आहे हे येथे स्पष्ट केलेले आहे. कवित्त्व हे संतत्त्वाचे सर्वश्रेष्ठ लक्षण आणि त्यातील सर्जनशीलता येथे स्पष्ट केलेली आहे.

विभावरी शिरूरकरांच्या कथावाङ्मयावरील वृंदा भार्गव यांचे समीक्षा लेखन, ज्योत्स्ना देवधरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वासंबंधीचे आशा कर्दळे यांचे लेखन या दृष्टीने लक्षणीय ठरलेले आहे. या दोन्ही लेखांमध्ये तत्कालीन सामाजिक परिस्थिती आणि प्रस्तुत लेखिकांचे कर्तृत्व यांचा संबंध विशद केलेला आहे. व्यक्तीचे व्यक्तिगत जीवन, सामाजिक परिस्थिती आणि त्यातूनच निर्माण झालेले वाङ्मयीन कर्तृत्व यांचा तिहेरी विचार येथे केला गेलेला आहे.

उज्ज्वला गोखले यांनी आपल्या लेखामध्ये स्त्रियांच्या एकांकिका लेखनाचा विचार केलेला आहे. त्यातून उपेक्षित एकांकिकारांचेही वाङ्मयीन कर्तृत्व स्पष्ट केलेले आहे. अंजली सोमण यांनी मराठीतील स्त्रियांच्या आत्मकथनाचा अभ्यास मांडलेला आहे. स्त्रीवादी दृष्टिकोणाचा प्रभाव आणि त्यातून आलेल्या आत्मकथनांचा येथे विचार मांडलेला आहे.

डॉ. नीलिमा गुंडी यांनी आपल्या लेखातून मराठी कवितेतील ईश्वरी संकल्पनेचा शोध घेतलेला आहे, हेच दिसून येते. म्हणजेच एकप्रकारे सांस्कृतिक जडणघडणीचा येथे वेध घेतलेला आहे. लता जाधव यांनी 'स्त्री चळवळ आणि राजकारण' मध्ये या सामाजिकतेच्याच दुसऱ्या पैलूसंबंधीचे येथे विवेचन केलेले आहे. डॉ.मृणालिनी शहा यांनी 'तरूणी शिक्षण नाटिका' यांनी १९ व्या शतकातील कलाकृतींचा सामाजिक परिस्थिती, लेखकाची भूमिका व नाटक यांच्या दृष्टिकोणातून अभ्यास मांडलेला आहे.

'देवदास' च्या मराठी अनुवादाच्या निमित्ताने मृणालिनी गडकरी यांनी शरदश्चंद्रांच्या साहित्याचा वेध घेतलेला आहे. त्याचबरोबर बंगाली साहित्यातील रवींद्रनाथ आणि बंकिमचंद्र यांच्या साहित्याचा वेध

घेतलेला आहे. मृणालिनी कामत यांनी जयंत पवार यांच्या 'अधांतर' या नाट्यकृतीची अभ्यासपूर्ण चिकित्सा केलेली आहे. विद्यागौरी टिळक यांनी 'जोनाथने लिव्हिंगस्टन सीगल' या अमेरिकन कथेचा समाजसापेक्ष व निरपेक्ष अशा दोन्ही प्रकारे विवेचन केलेले आहे. डॉ. उमा कुलकर्णी यांच्या 'कर्नाटकात मराठी लेखक' हा लेख विभिन्न भाषिक संस्कृतीतील मराठी वाङ्मयाची जडणघडण स्पष्ट करणारा लेख आहे.

'माधव आचवल यांची कथा समीक्षा' हा सरोज पाटणकर यांचा समीक्षा लेख तसेच 'विमल प्रतिभेचे सहृदय समीक्षक' - व. दि. कुलकर्णी हा लेख. प्रस्तुत दोन्ही लेख समीक्षेची समीक्षा करणारे आहेत तर 'विशाखातील प्रेमकविता : मूल्यविचार' हा शुभांगी मोरे यांचा लेख प्रेमकाव्याचे मूल्यमापन करणारा आहे.

एकूणच या सर्व समीक्षालेखांमधून समीक्षेच्या संदर्भात नवी दिशा दाखविणारे आहेत. यामधून स्त्री समीक्षकांची तात्त्विक चिंतन क्षमता स्पष्ट झालेली आहे. एकूण समीक्षेच्या प्रांतात आपला स्वत:चा आगळा वेगळा ठसा उमटवू पाहणाऱ्या अभ्यासिकांचे तात्त्विक चिंतन येथे स्पष्ट झालेले आहे.

गौरवग्रंथाच्या दुसऱ्या विभागातून लीला गोविलकर यांच्या व्यक्तिगत जीवन आणि वाङ्मयीन कर्तृत्वाची माहिती सुधा भट यांच्या लेखातून आलेली आहे. कु. अंजली जोशी यांनी लीला गोविलकर यांची घेतलेली मुलाखत यांमधून त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाची दिशा स्पष्ट झालेली आहे. शेवटी लीला गोविलकर यांचा अल्पपरिचय देण्यात आलेला आहे.

एकूणच 'समीक्षा विविधा' हा लीला गोविलकर यांचा गौरवग्रंथ स्त्री समीक्षेला वाहिलेली गौरवांजली आहे.

## ६. समारोप :-

सदर प्रकरणातून गौरवग्रंथ या संकल्पनेचा वेध घेतला गेलेला आहे. गौरवग्रंथाचे स्वरूप त्यांचे आगळे-वेगळे विशेष स्पष्ट झालेले आहेत. गौरवग्रंथांच्या प्रमुख तसेच काही गौण प्रेरणा इ. येथे परामर्श घेण्यात आलेला आहे. गौरवग्रंथांची मराठी वाङ्मयातील परंपरा आणि या परंपरेतील महत्त्वपूर्ण गौरवग्रंथांचा येथे परामर्श घेण्यात आलेला आहे.

गौरवग्रंथामधून घेतला जाणारा व्यक्तीशोध आणि 'माणूस' व 'कलावंत' म्हणून वेगवेगळे होणारे जीवनदर्शन यांचा परामर्श घेतला गेलेला आहे. व्यक्तिगत जीवन आणि वाङ्मयीन कर्तृत्व यांबरोबरच साहित्य व समीक्षा क्षेत्रातील अंगोपांगाचा स्वतंत्रपणे घेतलेला वेध येथे दिसून येतो. मराठी वाङ्मयामध्ये गौरवग्रंथांची दीर्घ परंपरा नसली तरी देखील वैशिष्ट्यपूर्ण मात्र निश्चित आहे, हे दिसून येते. ग्रंथांचे लेखन जरी निमित्ताने झाले असले तरी देखील लेखन 'व्यक्ती' केंद्रबिंदू न मानता साहित्य व समीक्षेलाही महत्त्व

दिले आहे हे दिसून येते. व्यापक साहित्यक्षेत्रामध्ये 'गौरवमूर्तीचे' दिसून येणारे विशिष्टत्व येथे स्पष्ट झालेले आहे.

**निष्कर्ष :-**

१) एखाद्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आणि त्यांच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा मागोवा तसेच समीक्षादृष्ट्या विविध अंगोपांगांना एकाच वेळी न्याय देण्याचे कार्य गौरवग्रंथांतून होत आहे.

२) संपादित स्वरूपात असणाऱ्या गौरवग्रंथांच्या माध्यमातून मराठी साहित्य व समीक्षेचे विद्यमान दर्शन घडते.

३) मराठी साहित्यातील निवडक वाङ्मय उपासकांच्या प्रज्ञा व प्रतिभा यांच्या गौरवाच्या माध्यमातून एक नवे अभ्यासक्षेत्र गौरवग्रंथांच्या माध्यमातून निर्माण झालेले आहे.

४) 'यथोचित गौरव' व 'ऋणातून उतराई होणे' या प्रमुख प्रेरणांच्या बळावरच गौरवग्रंथ निर्मिती झालेली आहे.

५) एकाचवेळी अनेकविध विषयांना समीक्षात्मक न्याय देण्याचा प्रयत्न गौरवग्रंथांमधून केला गेलेला आहे.

६) व्यापक साहित्यक्षेत्रामध्ये एखाद्या व्यक्तीचे विशिष्टत्व गौरवग्रंथांमधून दिसून येते.

७) गुरूचा निरपेक्ष गौरव करून एक नवा संदर्भ ग्रंथ म्हणून गौरवग्रंथ संकल्पना उदयाला आलेली आहे.

८) एकूणच - गौरवार्थ व्यक्तीचा अभ्यासविषय केंद्रस्थानी ठेवून विशिष्ट विषयांवर लिहून घेतलेल्या समीक्षात्मक लेखांचा संग्रह म्हणजे गौरवग्रंथ होय.

## संदर्भ


१. चुनेकर, सु. रा. - 'संशोधन स्वरूप आणि पद्धती', कल्पना प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८३, पृ. ५६.

२. चुनेकर, सु. रा. - 'सूचीची सूची', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९९५, पृ. ३१-४५.

३. गोखले, द. न., भावे स. शि., पाध्ये रा. कृ. (संपा) 'साहित्यविचार', व्हीनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृ.४-५.

४. तत्रैव, पृ. ७

५. मंचरकर र. बा. सद्भाव समिती (संपा.), 'साहित्याचा अभ्यास', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००३, पृ. १ (इतिकथन).

६. अकोलकर, ग. वि. (संपा.) - 'साहित्य व समीक्षा', चेतश्री प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १९९३, पृ. २-३.

७. कुलकर्णी, ग. वि. (संपा) - 'नवसमीक्षा', मेहता प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८२, पृ.३

८. भागवत, श्री. पु., रसाळ सुधीर (संपा.) - 'साहित्य : अध्यापन आणि प्रकार', मौज प्रकाशन व पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९८७, पृ.१-२

९. मंचरकर, र. बा., (संपा.) - 'वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन', सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९८७, पृ. ७

१०. तत्रैव.

११. अकोलकर, ग. वि. (संपा.) उनि.

१२. कुलकर्णी, गो. न. (संपा.), उनि, पृ. ५ ( प्रास्ताविक)

१३. गोखले, द. न., भावे, स. शि,. पाध्ये, स. कृ. (संपा.) उनि.

१४. भागवत, श्री. पु. - रसाळ सुधीर (संपा.) उनि.

१५. गुंडी, नीलिमा (डॉ) 'साहित्य-समाज संबंधांचा आधारग्रंथ' ( लेख) दैनिक सकाळ, ९/९/२००७.

१६. कोतापल्ले, नागनाथ (संपा) - 'साहित्य व समाज', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००७.

१७. टिळक, विद्यागौरी (संपा) - 'समीक्षा विविधा', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००५.


----x----